Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# छत्रपती शिवाजीमहाराजांची दक्षिण मोहिम, राज्यविस्तार व प्रशासन

**प्रा. डॉ. कार्तिक गावंडे**
विभागप्रमुख, इतिहास विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

छत्रपती शिवाजीराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य स्थापना केल्यावर त्याच्या विस्तारासाठी दक्षिण भारतात मोहिम काढली. राज्यभिषेकाचा खर्च भरुन काढणे आणि विजयनगरच्या साम्राज्यासारखे हिंदु राज्यांचे पुर्नजीवन करणे. यासारखे तर्कवितर्क इतिहास अभ्यासकांनी लावले असले तरी त्यांना दक्षिणेत एक भक्कम शासन निर्माण केले.या मोहिमेचा सविस्तर अभ्यास केल्यास त्यांच्या या मोहिमेच्या मराठा सत्ता विस्ताराची माहिती मिळते.

**१) दक्षिणेवर जात असतांना स्वराज्याची लावलेली व्यवस्था**

दक्षिण स्वारीवर जातांना शिवाजीराजांनी स्वराज्याचे तीन भाग केले व प्रत्येक भागावर सर कारकुन नेमले. मुख्यप्रधान-मोरोपंत, सचिव- अण्णाजी दत्तो व मंत्री दत्ताजी वाकसीन या अष्टप्रधान मंडळातील विश्वासु सहकाऱ्यांना अधिकार तर दिलेच त्या-त्या भागातील सैन्याला त्यांच्या आज्ञा मानायाचे हुकूम दिले. शिवाय सुभेदार सरकारकुन, कारकुन, मुजूमदार, सेनापती, हवालदार ही त्या नंतरची अधिकाऱ्यांची फळी त्यांच्या मदतीला होती.

**२) शिवाजीराजांच्या मोहिमेच्या वेळी दक्षिणेतील राज्यांची स्थिती**

कृष्णा तुंगभ्रदा नद्यांच्या दक्षिणेस केळदी, म्हैसूर, मलबार, केरळ व मारवा ही स्वतंत्र राज्य होती. उर्वरित दक्षिण भारत अदिलशाह व कुतूबशाह यांच्या कमी अधिक प्रमाणात ताब्यात होता. यापैकीच मिरजुमल्याच्या भागावर मोगल हक्क सांगत होते तर बंकापूर-बैगंलोर, शिरे,वेल्लोर, जिंजी व वली गोडंपुरम याठिकाणी बहलोल खान शहाजी व व्यकोंजी यांच्या कालपरत्वे बदलत जाणाऱ्या जहागिरीच्या नावाखाली अनिर्बंध सत्ता होती. ते स्वायत्तच वागत होते. कर्नूल व अनंतपूर या भागातील आफ्रिका खंडातील अबेसेनियातून आलेल्या व पन्हाळयाला शिवाजीराजांना कोंडीत पकडणाऱ्या सिध्दी जौहरच्या पुढच्या पिढयांची म्हणजे सिध्दी मसूद, सिध्दी रेहान व शार्जाखान यांच्या जहागिऱ्या होत्या ते तिघेही बिजापूर दरबारात जे गट पडले होते त्यात दक्षिण गटाचे समर्थक होते. असे असले तरी तेही स्वायत्तच वागत होते. आणि त्यांचा कल भागानगरच्या कुतूबशहाकडे होता तर विजयनगरच्या दक्षिणेस म्हैसूर सीमेपर्यत लहान-लहान पाळेगार होते. त्यांना व्यंकोजी व बहलोल खान बिजापूरी सत्तेचा धाक दाखवत खंडणी वसूल करीत होते. तंजावर व्यंकोजीने आदिलशहाच्या आज्ञेने जिंकले होते. परंतू अदिलशाही दरबारातील कट-कटी व कमकूवत पाहून तेथे स्वत:ला राजा घोषित केले. त्याला हुसूकावून लावण्याच्या अदिलशहाच्या जबर इच्छेला सैन्यशक्ति व द्रव्य याची कमतरता होती.

दक्षिणेत व्यंकोजी शहाजी भोसले म्हणजे शिवाजीराज्यांचे सावत्र बंधु होते. शहाजीराजांना महाराष्ट्र व कर्नाटक अशा दोन ठिकाणी आदिलशहाने जहागिरी दिली होती. पुणे, सुपे, चाकण व इंदापूर हि जहागिरी जिजाऊ व शिवाजी यांच्याकडे तर कर्नाटकात ते स्वत: जहागिरी सांभाळत होते. त्यांच्या सोबत जिजाऊंचा मोठा मुलगा-शिवाजीराजांचे वडील बंधु संभाजीराजे हे होते. कणकगिरीच्या लढाईमध्ये अफजल खानासोबत संयुक्त मोहिम सुरु असतांना भोसले घराण्याचा व्देष करणाऱ्या अफजल खानाने हेतूपुरस्कर उशीर केल्याने संभाजीराजे मारले केले. यानंतर शहाजीराजांचा पत्नी तुकाबाई व पुत्र व्यंकोजी असा परिवार कर्नाटकात राहिला.तेथील वारस व्यंकोजी ठरले. शिवाजीराजे राज्याभिषेकानंतर छत्रपती झाले. परंतु व्यंकोजीने दक्षिण स्वारीच्यावेळी शिवाजीराजांना साथ न देता फटकून राहणे पसंद केले. वास्तविक वडीलोपार्जित सत्ता या नात्याने शिवाजीराजे या जहागिरीचेही हक्कदार होते. शहाजीराजांच्या बैगलोर जहागिरीच्या पश्चिमेस सिंह नदीपर्यत चेनपट्टनम, बेनूल, रामनगर, उत्तरेस शिवगंगा,

निममंडल, दोडडवचिक, बाळापूर, सिदलगड्डा तर पुर्वेस हेस्कोट, कोलार अशी विभागनी झालेली होती. यापैकी बैगलोरचा काही भाग व्यंकोजीची पत्नी दिपाबाई हिला चोळीबांगडी तर शिरेभागातील काही प्रदेश शिवाजीराजांचे सख्खे वडीलबंधु संभाजीची विधवा पत्नी जैवंतीबाई व त्यांच्या मुलांना शहाजींच्या काळापासून दिलेला होता. शिवाय कोल्लार ते चित्तुर या दरम्यान गुड्डा यत्त्म प्रदेशात वर्चस्व अदिलशहाचे असले तरी देशमुख हया शहाजीच्या होत्या. पर्यायाने या भु-भागावर भोसल्यांचे म्हणजेच छत्रपती शिवाजी राजांचे वडिलोपार्जित अधिपत्य होते. अशी दक्षिणेतील राजकीय परिस्थिती होती.

**३) नायकांशी संबंध व राज्यविस्तार**

या मोहिमे दरम्यान चित्तुर, वांदीवाश, कलहस्ती, यच्चप्पा, हे नायक तर काही पाळेगार शिवाजीराजांकडे आल्याचा उल्लेख आहे. तंजावरच्या पश्चिमेस मधुरेचा नायक होता. तो विजापूरला खंडणी देत असे. आता शिवाजीराजांना देऊ लागला. म्हैसूरचा नायक इंग्रजीपत्राप्रमाणे शिवाजीराजांना शरण आला होता. तर चिकदेवरा बिन्नपम् व अप्रतीमविरचरितम् या कर्नाटकी साधनानुसार शिवाजींचा पराभव झाला होता. असा उल्लेख आला आहे. तर मॉर्टिनने लिहिलेली की, म्हैसूर नायकांचा दुत राज्यांच्या भेटीस आला होता. परंतु तह झाला नाही. तात्कालीन परिस्थितीनुसार म्हैसुर नायकांने तह करुन खंडणी दिली का नाही? हे स्पष्ट होत नसले तरी त्यांने शिवाजीराजांच्या मृत्यूपर्यंत राज्य वाढविण्याचा प्रयत्न केला नाही. म्हैसुर नायकाशी झालेल्या बिजापुरच्या सरदारांचे आक्रमणे बघता ती सर्व श्रीरंगपट्टणम् पर्यत झालेली आहे. एकही सरदार म्हैसुर राज्यांपर्यत गेला नाही. तेव्हा शिवाजीराजे सुध्दा कावेरीपर्यत गेले असावे, असे इतिहासकार मानतात. यावरुन त्यांच्या सिमा निश्चित करता येतात. कावेरी नदी स्वराज्याची दक्षिणेतील हद्द ठरते.

**४) कर्नाटकची पश्चिम किनारपट्टी**

येथे केळदी राज्य होते. बसरुरची लुट सोडून शिवाजीराजांचा या किनारपट्टीशी फारसा संबंध नाही.इ.स. १६७२ साली सोमशेखर नायक मृत्यू पावल्यावर चेन्नमा राणीने शिवाजी राजांच्या मदतीने दत्तक पुत्र घेवुन राज्य चालविले व पोर्तुगीजापासून राज्य वाचविले. येथून शिवाजीराजांना आणि पुढे संभाजीराजांना खंडणी येत असल्याचा उल्लेख आहे. औरंगजेबाच्या आक्रमणाच्यावेळी त्याचा राग पत्करुन राजाराम महाराजांना जिंजिला जातांना आपल्या राज्यातून जावु दिले व मदतही केली. थोडक्यात ते राज्य मित्रराज्य होते.

**५) शिवाजीराजे व दक्षिणेतील पाळेगार यांचे संबंध**

सौधुर, उज्जैनी, हरपनहल्ली, चैन्नगीरी, चित्रदूर्ग, हिरीयूर,तरीकेरी, बाणावर, आसिकेरी, चिकनायकनहल्ली, तुरुवेकेरी, कुनीगल व मागडी येथे पाळेगार इ.स. १६७८ पर्यत बिजापुरचे मांडलीक होते. शिवाजीराजांचा तोपर्यत संबंध नव्हता. यानंतर बिजापुर सत्ता कमकूवत झाली. व पाळेगार स्वतंत्र वागु लागले. दक्षिणस्वारीच्या वेळी या पाळेगारांनी शिवाजीराजांना कोठेच विरोध केले नाही पर्यायाने त्यांचे वर्चस्व पाळेगारांनी मान्य केले होते. पाळगारांचे वैशिष्टय असे की, ते बलीष्ठ सत्तेच्या लगेच आधिन होत असत. त्यांनी शिवाजीराजांकडे येऊन वर्चस्व मान्य केल्याचे मॉर्टिन लिहितो व अप्रतीमविरचरित्रम् या ग्रंथातही उल्लेख आला आहे. पुढे औरंगजेबाविरुध्द लढत असतांना संताजी-धनाजीला या भागाने पुर्ण मदत केली होती. औरंगजेबाची शेवटची लढाई या भागातील यचप्पा नायकाविरुध्द होती.

**शिवाजीराजांच्या दक्षिणमोहिमेचा परतीचा प्रवास**

शिवाजीराजे दक्षिणेहून परत येताना बेलवाडीच्या मल्लम्मा देसाईनीशी त्यांना लढावे लागले परंतु नंतर तीच शिवाजीराजाची पाठीराखी बनली व पुढे तिने महाराणी ताराबाईस खुप मदत केली. विजयनगर परिसरात शिवाजीराजांचे वर्चस्व निर्माण झाले होते. बहलोन खानाची जहागिर बंकापुरला होती. व ती १६७९ पर्यत त्याच्याकडे होती. ०३ मार्च १६७९ ला मोरोपंतानी कोप्पळचा किल्लेदार काशिमखानला पैसे देऊन तो घेतला. तसेच कनकगिरी व बल्लारी हेही ताब्यात घेतले. आणि विजयनगरही शिवाजीराजांकडे आहे. अशाप्रकारे १६७९ पर्यत बहलोल खानाचा संपुर्ण प्रदेश शिवाजीरांजानी जिकंला. हंपी येथील जनतेने शिवाजीराजांना परतीच्या

प्रवासात विजयनगर येथे मुक्कामी थांबले असतांना आमचे राज्य स्विकारावे म्हणुन विनंती केली होती. यावरुन तुंगभद्रेच्या दोन्ही काठावर शिवाजीराजांच्या सिमा निश्चित झाल्या होत्या.बेल्लारीचा श्रीमंतगड शिवाजीकडे होता.

**युरोपियनांशी संबंध**

**इंग्रज**

मद्रासच्या इंग्रजांशी शिवाजींराजांचे चांगले संबंध होते. कारण विषबाधा झाल्यानंतर लागणारे उतारे व मालदिवचे नारळ त्यांना मिळाले होते. पंरतु, धुर्त इंग्रजांनी सुरुंग उडविणारे व बांधकाम करणारे माणसे पाठवितांना विविध कारणे सांगुन टाळाटाळ केली होती. शिवाजींराजे दक्षिण मोहिमे दरम्यान इंग्रज अधिकाऱ्यांनी व्यापार वाढला असुन लोक शांततेत राहत आहे.असे पत्र कंपनीला लिहिलेले उपलब्ध आहे.

**डच**

डचांनी शिवाजींराजांना तेवेनापट्टणला वखार करण्याची परवानगी मागितली होती. ती त्यांना दिली त्याचे नुतनीकरणही करण्यात आले होते. पंरतु १९ सप्टेंबर १६७८ ला डच तेथून निघून गेले.मार्टिनच्या लिखानानुसार शिवाजीरांजाचे अधिकारी या डचांना जावु नका, असे सांगत असतांनाही तेवेनापट्टण सोडले. पंरतु याचा डच् साधनामध्ये उल्लेख नाही. तर श्रीमती अरुण यांच्या लिखानाप्रमाणे डचांना दिलेल्या नविन परवान्यावर ऑगस्ट १६७७ अशी तारीख आहे. ब्राम्हणांनी हे पत्र डचांना देण्यास एक वर्ष उशीर केल्यामुळे त्यांनी तेवेणापट्टणम सोडणे योग्य समजले.

**फ्रेंच**

शिवाजीराजे फ्रेंचाबद्दल साशंक होते.कारण ते  शेरखानास मदत करतील.अशी भिती राजांना वाटत होती. कारण फ्रेचांनी शेरखानाला बरेच कर्ज दिले होते. ते बुडू नये म्हणुन ते शेरखानाची पाठराखण करीत होते.या फ्रेंच-इंग्रजांना विजापूर आणि गोवळकोंड्याशी थेट संपर्क करण्याची परवानगी होती.याच वेळी शेरखान व बहलोल खान यांच्यातील पत्र व्यवहार फ्रेंच टपालाने झाल्याचे मार्टीनने लिहिले आहे.

**राजघराण्यांची व्यवस्था :**

शिवाजीराजांनी व्यंकोजीचा पराभव केला असला तरी तंजावरचे राज्य त्याच्याकडे कायम केले होते. त्याची पत्नी दिपाबाई हिला बंगलुर व आजुबाजूचा प्रदेश चोळी बांगडीसाठी लावुन दिला होता. तर शिवाजीराजांचे वडिल बंधु संभाजीराजे यांच्या पत्नी जयवंतीबाई व त्यांच्या मुलांकडे शिरे, कनकगिरी व कंदर्पी या भागातील जहागिरीची गावे कायम केली. कारण हि व्यवस्था शहाजी राजांच्या काळापासुन होती. तसेच शहाजीचे दासी पुत्र संताजी, प्रतापजी व भवानजी या भावानांही उत्पन्ने लावुन दिली होती.अशी व्यवस्था त्यांनी कायम केली.

**राजांचे दक्षिणेतील प्रशासन व व्यवस्थापन :**

**सरकारकुन**

रघुनाथपंत हणमंते अमात्य जुलै १६७७ मध्ये महाराष्ट्रातुन दक्षिणेकडे आले. त्यांनी मदुरेशी संधी करुन दिला. शिवाजीने परतण्याचे सुमारास त्यांना सरकारकुन या सरसुभेदार नेमले. मार्टिन त्यांना गव्हर्नर जनरल म्हणुन संबोधतो. संभाजी महाराज गादीवर आल्यावर संताजीने (शिवाजीचा सावत्र भाऊ) रघुनाथपंतांना बेडी घातली. पण राजारामास गादीवर बसविण्याचे कटात संबंध नसल्याचे आढळुन आल्यावर बेडी काढून महाराष्ट्रात पाठवले.तोपर्यंत ते या भागात सर्वोच्च पदावर होते.

सर्व स्थानिक, सैनिकी, परराष्ट्र व मित्रराज्य व्यवहार त्यांचेकडे होते. शेरखान या भागात होता, पण कोणत्याही नायकाने त्यांना मदत केली नाही. हंबीररावांनी तंजावर घेतले पण शिवाजीच्या आज्ञेवरुन व केलेल्या संधीनंतर ते राज्य व्यंकोजीस परत केले. म्हैसूरच्या नायकाने पण या काळात गडबड केली नाही. युरोपिय सत्तांना, विशेषत: फ्रेंचाना ते पुरुन उरले.इतर सर्व नायकांशी पण संबंध चांगले राखले.त्यांच्या म्हैसूर, मदुरा व व्यंकोजी एकत्र होऊन शिवाजीविरुध्द लढले नाहीत.

**सेनापती :**

शिवाजीने हंबीररावांना सेनापति म्हणून मागले ठेवले. संताजी पण होता. त्यांनी व्यंकोजीचा पराभव केला. याशिवाय आणखी लढाया झाल्या नाहीत. हंबीरराव थोड्याच दिवसात महाराष्ट्रात परत आले. संताजी मग सेनापति झाला. तिकडे ३-४-००० घोडदळ ठेवले होते. मार्टिन ते लिहिल्याप्रमाणे लहान सहान नायक एकत्र होण्याची शक्यता नसल्यामुळे सर्व घोडदळ ठेवण्याची आवश्यकता भासली नाही.

**मुझूमदार, सुभेदार (नागरी) :**

दक्षिण प्रदेश किती सुभ्यात, तालुक्यात, महालात, परगण्यांत विभागला होता. हे उपलब्ध नाही. पण फ्रेंच वखार असलेल्या पांडेचरी भागात मार्टिनने लिहिल्याप्रमाणे तीन निरनिराळे सुभेदार आले होते. जिंजी घेतल्या बरोबरच तिचे विठ्ठल पीलदेव गारोडकर यांस मुझूमदार नेमले. इंग्रजी पत्राप्रमाणे जुन १६७७ मध्येच त्याने चेन्नई जवळच्या भागात कर गोळा करण्यास सुरुवात केली. मार्टिन पण जुले १६७७ मध्येच कारभार पाहण्यासाठी दोन ब्राम्हण पॉडेचरीला पाठवले व त्यांनी ऑगस्ट मध्ये फ्रेंचाकडूनपण कर वसूल केला असे लिहितो. (शिवाजी त्यावेळेस शेरखानाशी लढत होता) बंगलोरला गेल्याबरोबर त्याभागासाठी शिवाजीने रंगो नारायण (रघुनाथपंताचे भाऊ) यांना मुझूमदार नेमले.

मार्टिन यांना ब्राम्हण असे संबोधतो व ते लुच्चे, लबाड, जुलमी, लाचखाऊ आहेत असेही लिहितो. सप्टेंबर १६७८ मधल्या गोपाळ पंडित या सुभेदाराने मार्टिन जवळ डचांची चौकशी केली व डचबद्दल माहिती देत राहण्याबद्दल सांगितले. या सुभेदाराने तेवेनापट्टणला (डचांची वखार असलेल्या बंदरात) गढी बांधली असे पण मार्टिन लिहितो. मार्च १६७९ मध्ये पॉडेचरीला आलेल्या सुभेदाराच्या अवलदाराकडून फ्रेंच शेरखानाला मिळतील, त्यांना काढून टाकले पाहिजे. अशी माहिती मार्टिनने काढली. या सुभेदराचे नाव मार्टिन विठुलो पंडित (विठ्ठल पीलदेव गारोडकर, जिंजीचा पहिला सुभेदार) असे देतो. हे सुभेदार त्या त्या भागात वसूल करत असत.

**सुभेदार (सैनिकी), हवालदार**

शिवाजीने जिंजी घेतल्याबरोबर लगेचच मानाजी काटकर यास हवालदार (प्रातांचा) नेमले. मानाजी मोरे यांना बंगलोरचा सुभेदार (काही उल्लेखात हवालदार) नेमले. हे दोघेही सैनिक होते व प्रातांचे संरक्षणाची व्यवस्था त्यांचेकडे होती. मानाजी मोरे पंचहजारी होते. मानाजी काटकर पण असावेत. जिंजीला संताजी (शिवाजीचा भाऊ) प्रथम सैन्यात अधिकारी होता. हंबीरराव गेल्यावर तो सेनापति झाला. यावरुन तो आधी सुभेदार (सैनिकी) वा हवालदार असावा. त्याने एका लढाईत व्यंकोजीचा पराभव केला. मानाजी मोरे संभाजीच्या काळात म्हैसुरशी लढल्याचे उल्लेख आहेत.

**(ग्राम) कुलकर्णी - शानभाग**

शिवाजीने प्रत्येक गावात आपला अधिकारी पोहोचला पाहिले अशी दृष्टी प्रथम पासूनच ठेवली होती. मार्टिनने लिहिल्याप्रमाणे जुलै १६७७ मध्ये पॉडेचेरीस पाठविलेल्या ब्राम्हणांबरोबरच गावागावातून शासन स्थापण्यास ब्राम्हण पाठवले असे वीस हजार ब्राम्हण शिवाजी बरोबर होते. मार्टिनने मादण्णासंबंधी लिहिलेल्या वरुन हे मुख्यत्वे तेलगु ब्राम्हण असावेत. हा आकडा जरी खरा मानला नाही, तरी संख्या बरीच मोठी असावी. हे सर्व पुढे ग्राम कुलकर्णी झाले.

जेसूईट रिपोर्टप्रमाणे कोलेरुन नदीचे उत्तरेस त्यांचे सर्व असलेल्या गावातून शिवाजीचा माणूस येऊन वसूल करुन जाई. हा ग्रामकुलकर्णीच असावा. मार्टिन व जेसुईट त्यांचे लिहिण्याप्रमाणे हे सर्व जुलमी होते. पण इंग्रजांनी मे १६७८ चे पत्रात लोक शांततेत राहात आहेत असे म्हटले आहे.

तुंगभद्रेच्या उत्तरेस नवलगुंद महालात भद्रापूर येथील सन १६७८ मधील शिलालेखाप्रमाणे त्यागावी पाटील, शानभाग व रखवालदार शिवाजीने नेमले होते. या ग्रामकुलकर्ण्याबद्दल मार्टिनने एका ठिकाणी चांगले उद्गार काढले आहेत. त्याने लिहिले आहे की, वालदूर जवळच्या पाणथळ जमिनी या ब्राम्हणांनी लाभकारी

बनविल्या. देवळांची व मठांची इनामे हा ग्रामव्यवस्थेचा अविभाज्य व महत्वाचा भाग असतो. मे १६७८ पर्यत मार्टिनच्या म्हणण्याप्रमाणे देवळांची, मंठाची सर्व जुनी इनामे पुन्हा चालू केली. इतकेच नव्हे तर सर्व पांडवम म्हणजे कनिष्ठ जातीच्या लोकांची इनामे पण चालू केली होती.

**गड, कोट, किल्ले**

शिवाजीने जिंजी जिंकल्यावर लगेचच रायाजी नलगे यास किल्याचा हवालदार, तिमाजी केशव यांस सबनीस व रुद्राजी साळवी यांस इमारतीवर नेमले. २६ जुलै १६७७ ची राजाज्ञा आहेत. पहिल्यांत कोटउटलूरला नागोजी भोसले मुद्राधारी यांस कोटांचा हवाला व इतर काही नाईकवाडी नेमल्यांचे आहे. दुसऱ्यात चार तरसरनौबत (नावानिशी) व सात बारगिर तैनाता नेमुन पाठविले व तिसऱ्यांत फिरंगोजी जाधव यास इमारतीचा हवालदार म्हणून पाठवले. या चारी राजाज्ञा त्र्यंबकसुत मोरेश्वर या शिक्क्याने आहेत. ऐन लढाईच्या काळात सुध्दा कानुजाबत्याप्रमाणे या राजाज्ञा काढल्या आहेत. मार्टिन व जेसुईट रिपोर्ट दोन्ही शिवाजीने पुष्कळसे गडकोट पाडून टाकल्याचे व उंच जागी नवीन गडकोट बांधल्याचे लिहितात. जेसुईट रिपोर्ट गडकोटाच्या बाजुला असलेली पुष्कळ घरे पाडून टाकल्याने भेसूर भयानक देखावा दिसतो असे लिहितात. गढया उंच जागीच बांधणार, व गढयांच्या आसपास संरक्षणाचे दृष्टीने मोकळी जागा असणे आवश्यक आहे. तेव्हा बरीच घरे पाडली असल्यास नवल नाही.

मार्टिनने ऑक्टोबर ७८ मध्ये गोपाळ पंडित सुभेदाराने तेवेनापट्णला गढी बांधल्याचे लिहिले आहे, हे वर सांगितलेच आहे. मार्टिनने असेही लिहिले आहे की, पाडलेल्या गढयांतील तोफा व दारु गोळा सर्व जिंजीला पाठविण्यात आला. जिंजीसाठी शिवाजीने मद्रासच्या इंग्रजांकडे सुरुंग भिंती उडविणाऱ्या व बांधकाम करणाऱ्या माणसांना पाठवावे म्हणून लिहिले होते. अशी माणसे मिळाली नाहीत, तरीपण जेसुईटांनी लिहिल्याप्रमाणे जिंजीचे बांधकाम युरोपियनांच्या तोडीचे झाले होते. त्याची प्रचिती मोगलांना ७ वर्ष हा किल्ला घेता आला नाही यावरुन दिसून येते

**पगार**

गड कोट वगैरे ठिकाणी माणसे नेमतांना त्यांना तनखा नेमणुक पत्रात दिलेला आहे. अशीच व्यवस्था इतर सर्व ठिकाणी माणसे नेमतांना झाली असली पाहिजे. मार्टिनच्या लिहिण्याप्रमाणे घोडेस्वारास (बारगिर) महिना दोन होन पगार होता. घोंड्याची देखभाल सरकारी कामगार करत असत.

## संदर्भः

1) English Records on Shivaji - Dr. Sen
2) Foreign Biographies of Shivaji - Martin
3) The Nayak of Madurai - Martin
4) Jesuits Records - Father Hers Disouza
5) House of Shivaji and Karnataka (1636-1707) - S. Arur